**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.३१५ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.गजेंद्र अ.वारके,
रा.व्दारकामाई, व्दारकानगर, कांडली,
पो. परतवाडा, जि.अमरावती,
का.सुश्मिता देशपांडे लेआऊट, ब्राम्हणसभा,
परतवाडा , जि.अमरावती.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक,
राज्य उत्पादन शुल्क, अमरावती,
जि.अमरावती.
२. जन माहिती अधिकारी तथा
कार्यालय दुय्यम निरीक्षक,
राज्य उत्पादन शुल्क, अचलपुर,
जि.अमरावती.

**(आदेश पारीत दिनांक १३/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अमरावती श्रीमती यु.आर. वर्मा हया हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, श्री.र.मी. पाली हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अचलपुर, श्री.आर.बी. आमझरे हे हजर आहेत.

सदर प्रकरणात अर्जदाराला प्रपत्र 'अ' दिनांक ११/११/२००९ नुसार माहिती पुरविण्यात आली. अर्जदाराने मागितलेली माहिती ४ मुद्दयात आहे ती खालीलप्रमाणे.

१. मा.आर.बी. आमझरे, दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अचलपुर यांना दिनांक ०५/११/२००९ ला स्वत: हस्ते दिलेल्या नोटीस नुसार काय कार्यवाही करण्यात आलेली आहे? सविस्तर कळवावे.

२. आपल्या कार्यालयाचे आस्थापनेवर कार्यरत असणारे किती कर्मचारी मुख्यालयी वास्तव्यास आहेत याबाबत सविस्तर माहिती पाठवावी.

३. आपले कार्यालयात माहितीचा अधिकार कायद्यासंबंधीचा फलक लावण्यात आलेला आहे काय? नसल्यास सविस्तर कळवावे.

४. मुख्यालयी वास्तव्यास नसणा-या या कार्यालयाच्या कर्मचा-यांची यादी पाठवा.

त्यानंतर अर्जदाराचे समाधान न झाल्याने दिनांक १५/१२/२००९ ला दाखल केलेले अपिल दि.२२/१२/२००९ ला प्राप्त झाले व त्यात सुनावणी घेवुन दिनांक १९/०१/२०१० ला आदेश पारित केलेला आहे. प्रथम अपिलात दिलेला आदेश हा स्वयंस्पष्ट असुन अर्जदाराचे अपिल खारीज केलेले आहे.

अर्जदाराने त्यानंतर व्दितीय अपिल हया आयोगासमोर दाखल केले व त्यात अर्जदाराला सुनावणीची संधी देण्यात आलेली आहे. परंतु आज रोजी अर्जदार गैरहजर आहेत. अर्जदाराने व्दितीय अपिल दाखल करण्याबाबतचे कारण माहिती अपुर्ण, चुकीची व दिशाभुल करणारी असत्य व असमाधानकारक असल्याबाबत आहे. तसेच दिनांक १९/०१/२०१० चा आदेश मानवी हक्काचे उल्लंघन करणारा आदेश आहे असे म्हटले आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अपुर्ण व चुकीची व दिशाभुल करणारी असत्य व असमाधानकारक कशी आहे हे अर्जदार गैरहजर असल्यामुळे या आयोगाच्या निदर्शनास आणुन देवु शकले नाही. तरी, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य व नियमानुसार वाटत आहे म्हणुन अर्जदाराचे अपिल खारीज करण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.३१६/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. आसिमोद्दिन एम. खतीब,
रा.खतीब वार्ड क्र.२, पुसद,
ता.पुसद, जि. यवतमाळ
**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, पुसद,
ता.पुसद, जि. यवतमाळ
२. जन माहिती अधिकारी,
संजय गांधी निराधार योजना,
तहसिल कार्यालय, पुसद,
ता.पुसद, जि.यवतमाळ

**(आदेश पारीत दिनांक १३/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. आसिमोद्दिन एम. खतीब हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी तर्फे नायब तहसिलदार, पुसद श्री.एन.जी. बोंबले हे हजर आहेत.

अपिल क्रमांक २२९/२०१० हे दिनांक २४/११/२०१० ला निकाली काढलेले आहे. अपिल क्रमांक २२९/२०१० यामधील प्रपत्र 'क' व हया प्रकरणातील प्रपत्र 'क' हे सारखेच असल्यामुळे वेगळा निर्णय देण्याची गरज वाटत नाही. त्यामुळे सदरचे अपिल खारीज करण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

अपिल क्र. ३२०/ २०१०
जा.क्र.
दि.

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. राधाकृष्ण रामकृष्ण दांदळे,
मु.पो. खिरपुरी बु. ता.बाळापुर,
जि.अकोला.
**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था अकोला, कार्यालय
सहकार संकुल, आदर्श कॉलनी, अकोला.
२. जन माहिती अधिकारी,
सहाय्यक निबंधक कार्यालय,
सहकारी संस्था, तेल्हारा, जि.अकोला.

**(आदेश पारीत दिनांक १३/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. राधाकृष्ण रामकृष्ण दांदळे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तेल्हारा श्री.डि.आर. पिंजरकर हे हजर आहेत.

अर्जदाराचे प्रथम अपिल दिनांक ०५/०१/२०१० प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला यांनी निकाली काढलेले नाही. तरी, सदर प्रकरणांत आजपासुन ४ आठवडयाच्या आंत प्रथम अपिल निकाली काढावे व जी माहिती उपलब्ध आहे ती प्रथम अपिलाच्या सुनावणी दरम्यान अर्जदाराला विनाशुल्क उपलब्ध करुन दयावी. तसेच प्रथम अपिलात झालेल्या निर्णयाची प्रत अर्जदाराला देण्यात यावी.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.३२२ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**

श्री. राधाकृष्ण रामकृष्ण दांदळे,
मु.पो. खिरपुरी बु. ता.बाळापुर,
जि.अकोला.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी, पातुर,
ता.पातुर, जि.अकोला.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,
तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पातुर,
ता.पातुर, जि.अकोला.

**(आदेश पारीत दिनांक १३/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. राधाकृष्ण रामकृष्ण दांदळे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे मंडळ कृषी अधिकारी, पातुर श्री.एम.डी. जंजाळ हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, पातुर श्री.के.एन. पाटकर हे हजर आहेत.

सदर प्रकरणात अर्जदाराला माहिती उशिरा मिळाली ही बाब सिध्द आहे. आज कार्यरत असलेले जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी श्री.के.एन. पाटकर यांचे म्हणण्यानुसार ते २ महिन्यापुर्वी रुजू झाले. त्यांच्या आधी श्री.सराफ हे कार्यरत होते. तरी श्री.सराफ यांनी जन माहिती अधिकारी या नात्याने त्यांची जबाबदारी असतांना त्यांनी अर्जदाराला माहिती पुरविली नाही. तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पातुर यांचे प्रतिनिधी म्हणुन श्री.एम.डी.जंजाळ हे हजर आहेत. त्यांचे म्हणण्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी त्या वेळेला अर्जदाराला माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत पत्रव्यवहार केला होता. परंतु त्यांच्या म्हणण्यानुसार तालुका कृषी अधिकारी कार्यालयात माहिती उपलब्ध असतांना त्यांना पत्रव्यवहार करणे चुकीचे आहे. त्याबाबत त्यांनी तालुका कृषी अधिकारी यांना सदरची माहिती त्यांना पुरवावी असा पत्रव्यवहार केला. आज सुध्दा सदरची माहिती तालुका कृषी अधिकारी यांचे मार्फत पुरविली आहे. तरी, हयाबाबत चौकशी होणे आवश्यक आहे. तरी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, अकोला यांनी त्यांचे स्तरावर जे कोणी या प्रकरणात जबाबदार असतील त्यांचेविरुध्द सेवाविषयक नियमानुसार शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येते.

**आदेश**

१. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, अकोला यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पातुर यांनी अर्जदाराच्या प्रपत्र ‘अ’ दिनांक ०५/११/२००९ च्या अर्जावर जवळपास १ वर्षाने माहिती पुरविण्यात आली. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अर्जदाराच्या प्रपत्र ‘ब’ नुसार दाखल केलेल्या प्रथम अपिलामध्ये सुनावणी घेणे अपेक्षित असतांना सुनावणी घेण्यात आली नाही. तरी, हयाबाबत सक्षम अधिका-यामार्फत चौकशी करुन अहवाल या

कार्यालयास पाठवावा. तसेच जे अधिकारी / कर्मचारी हे अर्जदाराला माहिती उशिरा पुरविण्यास जबाबदार आहेत त्यांचेविरुध्द त्यांना लागु असलेल्या सेवाविषयक नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करुन ४ महिन्याच्या आंत अहवाल या आयोगास सादर करावा.

२. तसेच वरील प्रकारामुळे अर्जदाराला झालेल्या शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रासाबाबत रु.१५००/- अर्जदाराला ६ आठवडयाच्या आंत देण्यात यावे व ती रक्कम कोणाकडुन वसुल करायची याबाबत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, अकोला यांनी त्यांचे स्तरावर योग्य तो आदेश पारित करावा.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

प्रत, आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, अकोला

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ३१७/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. श्रीकृष्ण दौलतराव गयाणे,
रा.मानोली, पो.अरक, ता.मंगरुळपीर,
जि.वाशिम.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मंगरुळपिर,
ता.मंगरुळपिर, जि.वाशिम.

२. जन माहिती अधिकारी तथा
सचिव, ग्रामपंचायत कार्यालय, मानोली,
ता.मंगरुळपिर, जि.वाशिम.

**(आदेश पारीत दिनांक १३/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. श्रीकृष्ण दौलतराव गयाणे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे अधिक्षक, पंचायत समिती, मंगरुळपिर श्री.एम.एस. वानखडे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, मानोली श्री.व्ही.पी. वानखडे हे हजर आहेत.

सदर प्रकरणात अर्जदार यांनी प्रपत्र ‘अ’ नुसार दिनांक १८/११/०९ रोजी सचिव, ग्रामपंचायत, मानोली यांचेकडे ग्रामपंचायतला शौचालय बांधकामाकरिता मिळालेला निधी सन २००७-०८, झालेला खर्च व बांधकाम पुर्ण झालेल्या व अपुर्ण राहिलेल्या शौचालयाची माहिती मागितली. सदर माहिती या आयोगासमोर देण्यात आली आहे. दिनांक १८/११/२००९ पासुन अर्जदाराला माहिती उपलब्ध असुन कुठलीही कार्यवाही ३० दिवस पर्यंत करण्यात आली नाही. त्यामुळे दिनांक १९/१२/२००९ ला अर्जदाराला प्रथम अपिल दाखल करावे लागले. प्रथम अपिलाच्या सुनावणी दरम्यान सचिव, यांनी माहिती झेरॉक्ससह तयार ठेवायला पाहिजे होती. परंतु तसे न झाल्यामुळे गटविकास अधिकारी यांनी अर्जदाराने दिनांक ०४/०१/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थित राहुन माहितीचे निरीक्षण करावे व आवश्यक असलेली माहितीच्या झेरॉक्स प्रती सचिवांकडुन काढुन घ्याव्या असा आदेश दिनांक ०२/०१/२०१० रोजी पारित केला व त्या आदेशावर उपस्थित अर्जदार तसेच जन माहिती अधिकारी यांच्या सहया आहेत. सचिव यांचे म्हणण्यानुसार अर्जदार यांनी दिनांक ०४/१/२०१० ला निरीक्षण घेतले परंतु माहिती घेण्यास नकार दिला. तसेच दिनांक १५/०२/२०१० रोजी श्री.व्ही.पी. वानखडे, सचिव, ग्रामपंचायत, मानोली यांना गटविकास अधिकारी यांनी पत्र दिले व त्यात दिनांक ०२/०१/२०१० च्या आदेशानुसार अर्जदार श्री. श्रीकृष्ण दौलतराव गयाणे यांना दिनांक ०४/०१/२०१० रोजी संपुर्ण रेकॉर्डचे निरीक्षण तसेच आवश्यक रेकॉर्डची छायाप्रत दिलेली नाही असे लक्षात येते. सदर बाब गंभीर असुन शास्तीस पात्र आहे. वरील बाबीचा खुलासा ३ दिवसात करावा त्यानंतरही कुठल्याही प्रकारचे पत्र गटविकास अधिकारी यांना

मिळाले नाही. गटविकास अधिकारी यांना ०५/१/२०१० रोजी सचिव, सरपंच यांनी सही करुन एक पत्र दिले व त्यात सरपंच व काही गावकरी यांच्या उपस्थितीत श्री.गयाणे यांनी मागितलेली माहिती प्रत्येक मुद्दयासह दाखविली. माहिती पाहिल्यानंतर लेखी घेण्याकरिता लिहीलेला अर्ज सचिव यांनी अर्जदारास दिला असता त्यांनी त्या अर्जावर सही करण्यास नकार दिला. तरी, अर्जदाराचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७ (१) नुसार निकाली न काढल्यामुळे सचिव यांचेवर रु. २००० दंड लावण्यात येते. तसेच गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मंगरुळपिर यांनी रु. २०००/- (रु.दोन हजार फक्त) दंड हा प्रतिमहा रु. १००० प्रमाणे २ महिन्यात वसुल करावा व सदरची रक्कम माहितीचा अधिकार शिर्षाखाली जमा करावी. तसेच अर्जदारास माहिती या आयोगासमोर पुरविण्यात आली.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

(भास्कर पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
अमरावती खंडपीठ, अमरावती

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.३२१ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. राधाकृष्ण रामकृष्ण दांदळे,
मु.पो. खिरपुरी बु. ता.बाळापुर,
जि.अकोला.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, पातुर,
ता.पातुर, जि.अकोला.

२. जन माहिती अधिकारी तथा
सचिव, ग्रामपंचायत कार्यालय, चतारी,
ता.पातुर, जि.अकोला.

**(आदेश पारीत दिनांक १३/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. राधाकृष्ण रामकृष्ण दांदळे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा संवर्ग अधिकारी, पंचायत समिती, पातुर श्री.जी.के. बेले हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा सचिव, चतारी श्री.आर.के. बोथरे हे हजर आहेत.

अर्जदाराने प्रपत्र 'अ' नुसार दिनांक २२/०७/२००९ ला चतारी ग्रामपंचायतने गावांत केलेल्या कामाच्या ठरावाच्या नकला, ग्रामीण रोजगार हमी योजनेमधुन गांव कोसाचा रस्ता, महिलांसाठी शौचालय, दलित वस्तीतील पाईप लाईन, १२ व्या वित्त आयोगातील कामे, इत्यादी कामाबाबतची २००५ ते २००९ या कालावधीतील माहिती मागितली होती. सदर प्रकरणात सचिव, ग्रामपंचायत यांचे म्हणण्यानुसार तत्कालीन सचिव यांनी अद्यापपर्यंत माहिती हस्तांतरित केली नाही. तसेच सदरहु ग्रामपंचायत, चतारी येथील कारभाराबाबत फौजदारी गुन्हा दाखल असुन ते निलंबित आहे. त्यांचेकडुन रेकॉर्ड मिळाल्यास माहिती पुरविण्यात येईल. तरी, सदरची माहिती विनाशुल्क देण्यात यावी. अर्जदाराच्या प्रथम अपिलातील अर्ज प्रपत्र 'ब' दिनांक १७/०९/२००९ नुसार सदर प्रकरणात ४ आठवडयाच्या आंत आदेश पारित करावा. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.नंदनकर, सचिव यांनी अर्जदाराचा अर्ज ७(१) नुसार निकाली न काढल्यामुळे त्यांचेविरुध्द त्यांना लागु असलेल्या सेवा विषयक शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वयंस्पष्ट आदेश पारित करुन त्याची प्रत अर्जदाराला दयावी.

खालील आदेश पारित करुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**आदेश**

१. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी वर शिफारस केल्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराचा अर्ज ७(१) नुसार निकाली न काढल्यामुळे त्यांचेविरुध्द त्यांना लागु असलेल्या सेवा विषयक नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई ३ महिन्याच्या आंत पुर्ण करुन त्याचा अहवाल या आयोगास सादर करावा.
२. तसेच प्रथम अपिलात ४ आठवडयाच्या आंत आदेश पारित करावा.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**